


दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १५७ ●शनिवार, दि. ०६ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# भुजबळ कोर्टात गेले आणि आरक्षणाला काही झालं, तर मंडल आयोगाला चॅलेंज... जरांगेंचा थेट वार



**हैदराबाद गॅझेटनंतर ओबीसी नेते छगन भुजबळ नाराज असल्याच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मराठा आरक्षणाला धक्का लागल्यास मंडल आयोगाला आव्हान देण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. मराठ्यांनी विजय मिळवला असल्याचाही पुनरुच्चार जरांगेंनी केला आहे**

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

हैदराबाद गॅझेटचा जीआर काढल्यानंतर ओबीसी नेते छगन भुजबळ नाराज असल्याच्या बातम्या समोर येत आहेत. त्यावरून मनोज जरांगे बोलत होते. ओबीसी नेते छगन भुजबळ कोर्टात गेले तरी काही होणार नाही. हैदराबाद गॅझेट हे सरकारी दस्तावेज आहे. मात्र मराठा आरक्षणाला काही झालं तर मी मंडल आयोगावर चॅलेंज करणार आहे. देशात अहवालावर जिवंत असणारे एकमेव आरक्षण मंडल आरक्षण आहे. अहवालावर आरक्षण कधीचं लागून असतं, त्यामुळे मराठा आरक्षणाला काही झालं तर मी मंडल आयोगाला चॅलेंज करणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातील गॅलेक्सी रुग्णालयात मनोज जरांगे यांच्यावर उपचार सुरू आहेत. रुग्णालयातून त्यांनी पत्रकार परिषद घेत आपली भूमिका मांडली आहे. यावेळी जरांगे पाटील म्हणाले, आम्ही ओबीसीत घुसखोरी करत नाही. तर अधिकृत आरक्षणात येत आहोत. छगन भुजबळांना चांगलं माहीत होतं मराठे आरक्षण घेणार.

▶▶ उर्वरित पान २ वर

### आंबेडकरांनी किती वेळा टोले हाणावे ?

**प्रकाश आंबेडकरांना जाऊ द्या त्यांना मी मानतो. आंबेडकर अभ्यासू आहेत. छत्रपती, आंबेडकर वंशजांबद्दल मी बोलत नाही. सगळ्यांना सगळ्या गोष्टी कळतात. मात्र किती वेळ खोचक टोले हाणावे अन् किती वेळ समोरच्या समाजाने सहन करावे ? तरीही आम्ही दोन्ही घराण्याबद्दल बोलत नाही. त्यांनी समजून घेतलं पाहिजे, पण त्याला नाईलाज आहे. प्रकाश आंबेडकर कितीही काही म्हणाले, तरी मराठे ओबीसी आरक्षणाकडे घेऊन गेलोच असे जरांगे म्हणाले.**

# महाराष्ट्रातील सहा शिक्षक 'राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५' ने सन्मानित

**● राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते वितरण**

**शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल' : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू**



**नवी दिल्ली**

शिक्षक दिनानिमित्त विज्ञान भवन येथे आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण क्षेत्रातील डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड), सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई) आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर), डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई), प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती), आणि कौशल्य विकास क्षेत्रातील श्री. अनिल रामदास

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड : दैनिक मराठवाडा पत्र कार्यालय येथे श्रीनची आरती करताना श्री. विठ्ठल काळे, श्री.पिंटू करडुले, श्री. रोहन काळे, ॲड. दिपक गायकवाड, संपादक नरनाळे छायाचित्रात दिसत आहेत.*

# दिल्लीचे उपमुख्यमंत्री परवेश वर्मा यांनी घेतले महाराष्ट्र सदनातील 'श्री' चे दर्शन

**गणेश विसर्जनासाठी दिल्ली सरकारकडून ८५ कृत्रिम तलाव : परवेश वर्मा**



**नवी दिल्ली**

महाराष्ट्र सदनात सुरू असलेल्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आज दिल्लीचे उपमुख्यमंत्री परवेश वर्मा यांनी सदनातील ' श्री' दर्शन घेतले. या वेळी निवासी आयुक्त आर. विमला यांनी त्यांचे स्वागत केले. स्वयंसहायता गटातील कारागिरांनी तयार केलेली पारंपरिक शॉल तसेच विविध हस्तनिर्मित उत्पादने त्यांना भेट

▶▶ उर्वरित पान २ वर

# जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव कडून ग्राहकाची अडवणूक; तक्रार तहसीलदारांकडे

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील जय श्रीराम नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, माजलगाव यांच्याकडून ग्राहकाची नो ड्यूज प्रमाणपत्रासाठी अडवणूक करण्यात आल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

देसाई मोतीराम फपाळ, रा. बेलोरा, ता. माजलगाव, जि. बीड यांनी दोन वर्षांपूर्वी या पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. संबंधित कर्जाची परतफेड पूर्ण केली असूनही संस्थेकडून त्यांना नो ड्यूज प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. फपाळ यांनी अनेक वेळा पतसंस्थेत जाऊन कर्ज खात्याचे विवरण मागितले, मात्र ते नाकारण्यात आले. या पार्श्वभूमीवर त्यांनी तहसील कार्यालय माजलगाव व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था माजलगाव

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड दि. राजवीर अर्बन येथे श्रीनची आरती करताना दैनिक मराठावाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे, श्री. विठ्ठल काळे, पिंटू करडुले, आडवोकेट दीपक गायकवाड, रोहन काळे, आदी छायाचित्रात दिसत आहेत.*

# खासदार सुप्रिया सुळे यांना अध्यक्षपदावरून हटवले; त्यांच्या जागी उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार



**बारामती । प्रतिनिधी**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या संस्थेसाठी स्थापन करण्यात आलेल्या अभ्यागत मंडळाच्या अध्यक्षपदावरून खासदार सुप्रिया सुळे यांना हटविण्यात आले असून, त्यांच्या जागी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी, राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांची

▶▶ उर्वरित पान २ वर

# मुख्याधिकारी शैलेश फडसे साहेब लोकांच्या कानात बिडी बगलात रेडू समजू नका !


**कामचुकार किरण देशमुख वर आदि कारवाई करा ; नगरपालिका प्रशासनाला झोपेतून उठवा !**

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या तत्कालीन भ्रष्टाचारी मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या कार्यकाळात बीड शहरात मूलभूत सुविधांच्या नावाने नुसतीच बोंबाबोंब झाली. बीड नगरपालिकेचा फंड इतर ठिकाणी वळवण्यात माहीत असलेल्या मुख्याधिकारी यांनी बीड शहराला अक्षरशा वेठीस धरले होते. नगरपालिकेत न येता घरातूनच काम करणाऱ्या तत्कालीन नेता अंधारे यांच्या छाया छत्राखाली असणारे अधिकारीही कामचुकार झाले होते. बांधकाम विभागासारखे महत्त्वपूर्ण नगरपालिकेतले विभाग असणारे

▶▶ उर्वरित पान २ वर

### किरण देशमुख याची चौकशी कधी होणार



**बांधकाम विभागात कार्यरत असणारे अभियंता किरण देशमुख यांनी नगरपालिका फंडाची अक्षरशा वाट लावली तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांना विश्वासात घेत अनेक बिले अदा करण्यात आली. यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याची तक्रारी करण्यात आल्या मात्र तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी या प्रकरणाची कोणतीही चौकशी केली नाही. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी कारभार घेतल्यापासून नगरपालिकेची सुधारणा होईल अशी अपेक्षा आहे. मात्र मुख्याधिकारी कोणत्या धुंदीत आहेत त्यांना कार्यालयात येणारे कर्मचारी दिसत नाहीत का. बांधकाम विभाग महत्त्वाचा विभाग असूनही या ठिकाणी अधिकारी नसल्याने त्यांना माहीत नाही का ? अनेक प्रश्न उपस्थित होत असून मुख्याधिकारी किरण देशमुख यांची चौकशी करतील**

# मराठा आरक्षणासाठी उच्च न्यालयात आज कॅव्हेट दाखल ॲड. योगेश शेळके

**बीड । प्रतिनिधी**



मराठा आरक्षणासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांनी लढा उभारला त्यामुळे मागणीप्रमाणे राज्य शासनाने हैदराबाद गॅझेटियर चा अध्यादेश व इतर मागण्या मान्य केल्या. त्यामधील हैद्राबाद गॅझेटियर च्या अध्यादेशास कोणी कोर्ट मधे आव्हान दिले तर मराठा समाजाची बाजु मांडल्या शिवाय कोणताही न्यायालयीन निर्णय होऊ नये यासाठी आज उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर (औरंगाबाद) मध्ये आमचे सहकारी वकिल मराठा समाजाची नेहमी बाजू मांडणारे ॲड. ज्ञानेश्वर पोकळे पाटील यांच्या वतीने कॅव्हेट दाखल करण्यात आले आहे. राज्य सरकार ने काढलेली मराठा कुणबी आरक्षणाचा हैद्राबाद गॅझेटियर चा अध्यादेश टिकवण्यासाठी आज हाय कोर्टात कॅव्हेट दाखल केले आहे. ही जबाबदारी सरकारची असते परंतु सरकार निभावेल न निभावेल यावर अवलंबुन न राहता ती जबाबदारी आपले वकील बांधव म्हणुन निभावत आहेत.

▶▶ उर्वरित पान २ वर

# भुजबळांना कोर्टाचा खर्च मराठा समाजाने द्यावा: शिवाजी कवठेकर


**बीड । प्रतिनिधी**

परवा म्हणजे २ सप्टेंबरला काढलेल्या जीआर वर आम्ही न्यायालयात जाणार अशी प्रतिक्रिया देताना छगन भुजबळ अतिशय केविलवाणे व हतबल दिसत होते. कारण न्यायालयात गेल्यावर मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणारा हा जीआर रद्द तर होणार नाहीच; पण उलट ओबीसींना शरद पवार मुख्यमंत्री असताना आपण १९९४ ला दिलेले आरक्षण रद्द होऊ शकते!, याची खात्री त्यांना असल्यामुळे ते कमालीचे निराश दिसत होते. पण या जीआरवरील न्यायालयाचे मत कळणे गरजेचे असल्यामुळे, छगन भुजबळांनी न्यायालयात जायलाच हवे आणि त्यासाठी भुजबळांचा न्यायालयाचा खर्च आम्ही देऊ याची हमी मराठा समाजाने भुजबळांना द्यावी, असे आरक्षण बचाव आंदोलन समितीच्या वतीने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात अध्यक्ष शिवाजी कवठेकर यांनी म्हटलेले आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस खरंच खूप चाणाक्ष, अतिशय मुत्सद्दी व अति चतुर आहेत याची खात्री पटते.त्यांनी मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देणारा परवा काढलेला जीआर त्याचे मोठे उदाहरण आहे. २०१८ ला सुद्धा देवेंद्र फडणवीस मराठ्यांना ओबीसीतूनच आरक्षण देणार होते. त्यासाठी त्यांनी न्यायमूर्ती एमजी गायकवाड यांचा आयोग नेमला होता. या आयोगाने मराठा व कुणबी एक आहेत असे सांगितले होते.पण गायकवाड आयोगाचा अहवाल आल्यानंतर मराठ्यांना

▶▶ उर्वरित पान २ वर





# गडांचा राजा : राजगड

सह्याद्रीच्या उंच डोंगररांगांच्या कुशीत उभा असलेला, भव्यता आणि ऐतिहासिक वैभव यांचा अद्वितीय संगम म्हणजे राजगड! छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याच्या उभारणीतील पहिला भक्कम पाया या गडाने घातला. तब्बल पंचवीस वर्षे स्वराज्याची राजधानी म्हणून राजगडाने अनेक ऐतिहासिक घटना, शौर्यगाथा, राजकीय निर्णय आणि युद्धांचा साक्षीदार होण्याचा मान मिळवला. मराठ्यांच्या पराक्रमाला व स्वराज्याच्या कर्तृत्वाला दिशा देणारा हा गड, केवळ एक किल्ला नसून स्वराज्याच्या आत्म्याचे मूर्तिमंत प्रतीक आहे.

राजगड किल्लयावर पोहोचण्याचा प्रवास रोमांचकारी आहे. दाट जंगलातून जाणाऱ्या पायवाटा, खडतर चढण आणि सह्याद्रीच्या निसर्गसौंदर्याचा आनंद यामुळे हा प्रवास अविस्मरणीय ठरतो. गडावर पोहोचल्यानंतर दिसणारे विस्तीर्ण पर्वत आणि खोल दऱ्यांचे विहंगम दृश्य थकवा दूर करून मन भारावून टाकते. इतिहास, साहस आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम राजगडावर अनुभवता येतो. हा किल्ला केवळ एक पर्यटनस्थळ नाही, तर मराठ्यांच्या गौरवशाली इतिहासाचे दार आहे. इथली शांतता, प्राचीन वास्तू आणि डोंगरमाथ्यावर वाहणारा गार वारा प्रत्येकाला पुन्हा-पुन्हा येथे येण्यासाठी प्रेरित करतो.

प्राचीन इतिहास- आजचा राजगड किल्ला मुळात मुरुंबदेव या नावाने ओळखला जात होता. विविध राजवटींच्या अखत्यारीत असताना या ठिकाणी फक्त बालेकिल्लयाचा भाग अस्तित्वात होता. परंतु इ.स. १६४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला ताब्यात घेताच त्याचे पुनर्निर्माण सुरू झाले. तेव्हाच या गडाला राजगड म्हणजेच गडांचा राजा हे साजेसे नाव लाभले आणि स्वराज्याची राजधानी म्हणून तो घोषित करण्यात आला. या गडावर अनेक ऐतिहासिक घटना घडल्या. इथेच शिवाजी महाराजांचे सुपुत्र राजाराम यांचा जन्म झाला. त्यांची पत्नी सईबाई यांचे याच ठिकाणी दुःखद निधन झाले. १६६४ मध्ये सूरत लुटल्यानंतर मिळालेल्या संपत्तीचे संरक्षण याच गडावर करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाच्या लढायांची रणनीती राजगडावर आखली. भक्कम तटबंदी, मजबूत बुरुज आणि चतुराईने बांधलेल्या रचना यामुळे हा किल्ला अभेद्य बनला. मुघल आणि आदिलशाही सैन्याने कित्येक वेळा किल्ला जिंकण्याचा प्रयत्न केला.

आजही राजगड हा इतिहास, साहस आणि निसर्ग सौंदर्याचा संगम आहे. पर्यटनासाठी हा किल्ला एक उत्तम ठिकाण आहे. किल्लयावरील सुवेळा माची, संजीवनी माची आणि बालेकिल्ला ही विशेष आकर्षणाची ठिकाणे. राजगडावरून दिसणारे सह्याद्रीचे डोंगर आणि धुके भरलेले निसर्गदृश्य मन मोहून टाकतात. इतिहासप्रेमी, साहसिक पर्यटक आणि निसर्गप्रेमी यांच्यासाठी राजगड एक अनोखा अनुभव देणारे ठिकाण आहे.

नैसर्गिक रचना आणि संरक्षण व्यवस्था- राजगड किल्ला मध्ययुगीन स्थापत्यकलेचा अद्वितीय नमुना आहे. सुमारे ४० किलोमीटर परिघ असलेल्या या किल्लयाची समुद्रसपाटीपासून उंची १३७६ मीटर आहे. भक्कम तटबंदी आणि सुयोग्य रचना यामुळे हा किल्ला संरक्षण आणि प्रशासनासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरला.

या किल्लयाचा मध्यभाग पद्मावती माची म्हणून ओळखला जातो. येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे निवासस्थान होते. पद्मावती देवीचे मंदिर, पद्मावती तलाव आणि राजवाड्याचे अवशेष येथे पाहायला मिळतात. ही माची केवळ निवासासाठीच नव्हे, तर सैन्याच्या हालचालींसाठीही अत्यंत महत्त्वाची होती.

किल्लयाच्या पश्चिमेला संजीवनी माची आहे. येथे तीन स्तरांमध्ये बांधलेली तटबंदी आजही मराठ्यांच्या लढाऊ कौशल्याची साक्ष देते. शत्रूच्या हल्लयांपासून संरक्षण करण्यासाठी ही संरचना अत्यंत उपयुक्त ठरली. पूर्व बाजूला सुवेळा माची आहे. येथून दिसणारे निसर्गसौंदर्य विलोभनीय आहे. याच ठिकाणी नेढे नावाची मोठी नैसर्गिक दगडी कमान आहे. हा भूशास्त्रीय चमत्कार किल्लयाच्या सौंदर्यात भर घालतो. बालेकिल्लयावरून सह्याद्री पर्वतरांगेचे अप्रतिम दृश्य दिसते. पूर्वी येथे राजवाडा होता आणि याच ठिकाणी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले जात असत.

राजगडाची भौगोलिक व लष्करी रचना अतिशय अद्वितीय आहे. किल्ला डोंगरांच्या उंचसखल उतारांवर बांधलेला असल्याने तो जिंकणे जवळजवळ अशक्य होते. एका सरळसरळ तटबंदीवर अवलंबून न राहता तीन प्रमुख माच्या – पद्मावती, संजीवनी आणि सुवेळा या गडाला त्रिसूत्री स्वरूपात जोडलेल्या आहेत. या प्रत्येक माचीचा आपापला वेगळा उपयोग होता :

पद्मावती माची – गडाचे हृदय मानली जाणारी ही माची प्रशासनिक व निवासी केंद्र होती. येथे राजसदर, पद्मावती देवीचे मंदिर, महाराजांचे निवासस्थान, राणीवसा तसेच मंत्र्यांचे निवासस्थान यांचा समावेश होता. मोठमोठ्या पाण्याच्या टाक्यांमुळे या माचीवर वर्षभर पाणी उपलब्ध असे.

संजीवनी माची – पश्चिमेकडे पसरलेली ही माची मजबूत तटबंदी, अर्धगोलाकार बुरुज आणि पहारेकऱ्यांसाठी सोयीस्कर स्थानांनी युक्त होती. संरक्षण आणि आक्रमण अशा दोन्ही दृष्टींनी ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असे.

सुवेळा माची – पूर्वेकडे असलेली ही माची अरुंद व उग्र कड्यांवर पसरलेली आहे. येथे पाण्याची टाकी, पहारेकऱ्यांची ठाणी आणि गुप्त, अरुंद प्रवेशद्वार होते. शत्रूवर लक्ष ठेवण्यासाठी हे स्थान अनन्यसाधारण उपयोगी ठरत असे.

या तिन्ही माच्या एका ठिकाणी येऊन मिळतात – तो म्हणजे बालेकिल्ला. उंच मनोरे, भक्कम भिंती आणि विस्तीर्ण परिसरावर नजर ठेवणारा हा भाग म्हणजे गडाचा सर्वोच्च आणि अंतिम संरक्षणस्तर. गडाच्या प्रवेशासाठी पाली, गुंजवणे व अळू दरवाजा हे मार्ग वापरले जात. तसेच खडकात कोरलेल्या असंख्य टाक्यांमुळे पाणी व धान्यसाठा अखंड उपलब्ध राहावा याची काळजी घेण्यात आली होती.

गडाचे वैशिष्ट्य- राजगडाच्या बांधणीत केवळ संरक्षणाचा विचार केलेला नव्हता, तर राजकारण, प्रशासन, सैनिक व्यवस्थापन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा या सर्व बाबी लक्षात घेऊन गड उभारण्यात आला. वळणावळणाच्या पायवाटा, धान्यकोठारे, पहारेकऱ्यांच्या चौक्या यामुळे गड एक परिपूर्ण राजधानी ठरला.

सांस्कृतिक वारसा- आजचा राजगड हा फक्त एक पुरातन अवशेष नाही, तर जिवंत वारशाचे प्रतीक आहे. येथे होणारे उत्सव गडाच्या ऐतिहासिक महत्त्वाची आठवण करून देतात. दिवाळीच्या वेळी होणारा दीपोत्सव संपूर्ण गडाला दिव्यांच्या उजेडात न्हाऊ घालतो. शिवजयंतीच्या दिवशी तर हजारो लोक गडावर जमतात. पारंपरिक वाद्ये, भाषणे, शिवचरित्रावर आधारित नाटिका यामुळे गड पुन्हा एकदा इतिहासाच्या सोनेरी क्षणात जगू लागतो.

जागतिक ओळख- इतिहास, वास्तुकला, युद्धतंत्र आणि सांस्कृतिक महत्त्व यांचा अनोखा संगम असलेला राजगड आज युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या मालिकेत समाविष्ट होऊन भारताचे आणि मराठ्यांचे वैभव जगभर पोचवत आहे. राजगड किल्ला केवळ ऐतिहासिक वारसा नाही, तर तो एक साहस, एक प्रवास आणि मराठ्यांच्या अदम्य शौर्याला वाहिलेली आदरांजली आहे. येथील प्रत्येक दगड भूतकाळाच्या कथा सांगतो. इतिहासप्रेमींना येथे मराठ्यांच्या विजयगाथांचा अनुभव येतो. ट्रेकिंगच्या चाहत्यांसाठी हा किल्ला एक रोमांचक आहे. निसर्गप्रेमींना येथे सह्याद्रीच्या भव्य सौंदर्याचे दर्शन होते. येथील शांतता आणि वारा मनाला ताजेतवाने करतो.

राजगड महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आठवण करून देतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचे आणि पराक्रमाचे साक्षीदार असलेला हा किल्ला आजही दिमाखात उभा आहे. येथे आल्यावर प्रत्येक क्षण संस्मरणीय वाटतो. एकदा का तुम्ही येथे पोहोचलात, तर हा प्रवास केवळ एक ट्रेक राहणार नाही, तर तो एक ऐतिहासिक अनुभव बनून हृदयात कोरला जाईल. राजगड तुमची वाट पाहतो आहे, चला निघा गडांच्या राजाला भेट द्यायला!

**– संजय डी.ओरके, विभागीय संपर्क अधिकारी,**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई**

## बाप्पा विघ्नहर्ता !

थाटात येतो
राजा सारखा बसतो,
भक्तांकडे पाहून
गालात हसतो…
पाहताच बाप्पाला
येतो आनंदाचा पूर ,
ढोल ताशा नगाऱ्याचे
गगनाला भिडतात सूर…
थोड्याच दिवसांसाठी बाप्पा
भक्तांना भेटायला येतो,
वर्षभराचा दुरावा एका
क्षणात दूर करतो…
नाजूक त्याचे डोळे
शेला असतो भरजरी,
हिरे जडित मुकुट
पितांबर त्याचा भारी…
वाजत गाजत बाप्पा
मखरात येऊन बसतो,
भक्तांच्या मनात एक
वेगळाच उत्साह दाटतो…
सारा परिसर झगमगतो
लाईट तोरणे सजतात
बाप्पाच्या मंडपात
आरतीचे सूर उमटतात
बाप्पाच्या आगमनाचा
सोहळा रंगतो छान
बाप्पा विघ्नहर्त्याची
वेगळीच असते शान…
अशा आमच्या बाप्पाची
रंगत असते न्यारी,
भक्तांच्या गर्दीतून निघते
बाप्पा विघ्नहर्त्याची
स्वारी…
असा आमचा बाप्पा
सकळ विघ्नहर्ता,
तोच सुखकर्ता
तोच दुःखहर्ता …!

**–ज्योती रावराणे,**
**कांजुरमार्ग, मुंबई**

◆ पान १ वरून पुढे...

## भुजबळ कोर्टात...

आम्ही मुंबईत गेलो, विजय घेऊन परत आलो. भुजबळ यांचा विरोध बघता मराठ्यांनी ओळखायचं की ,आपण मराठे जिंकलो आहे. छगन भुजबळ आता शक्यतो ओबीसी नेता असलेली ओळख मिटू देणार नाही. त्याच्यापेक्षाही खूप मातब्बर नेते आहेत. समोरच्या ओबीसी नेत्याची छेड काढतो. उद्या त्या नेत्यांचे कसे नाक कापायचे, असं करून तो बाजूला सरकवतो. भुजबळ मरायला टेकला जरी तरी त्याच्या अंगातील खोड जाणार नाही, अशी बोचरी टीका मनोज जरांगे यांनी केली आहे.

## महाराष्ट्रातील सहा...

जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर) यांचा समावेश आहे. शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागातर्फे आयोजित या सोहळ्यात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण आणि १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, शिक्षण राज्यमंत्री डॉ. सुकांत मजूमदार, जयंत चौधरी, शिक्षण मंत्रालयाचे सचिव संजय कुमार, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाचे (चडऊए) सचिव देबाश्री मुखर्जी यावेळी उपस्थित होते.

या पुरस्काराचा उद्देश शिक्षकांचे समर्पण, नाविन्यपूर्ण कार्यपद्धती आणि विद्यार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी केलेल्या प्रयत्नांचा गौरव करणे हा आहे. मागील काही वर्षांपासून या पुरस्काराची व्याप्ती वाढवून उच्च शिक्षण तसेच कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयातील शिक्षकांनाही संधी देण्यात येत आहे.

शिक्षकांचे योगदान भारताला सुपर पॉवर बनवेल' – राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

या समारंभात मार्गदर्शन करताना राष्ट्रपतींनी 'आचार्य देवो भव' या उक्तीचा उल्लेख करत शिक्षकांचे समाजातील सर्वोच्च स्थान अधोरेखित केले. शिक्षक मुलांमध्ये आत्मसन्मान आणि सुरक्षितता जागवतात. त्यांचे यश हेच शिक्षकांचे खरे बक्षीस आहे, असे त्या म्हणाल्या. राष्ट्रीय शिक्षा धोरण २०२० च्या अंमलबजावणीत शिक्षणाला आनंददायी बनवण्यावर भर देताना त्यांनी बालिका शिक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले. सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करत त्यांनी डढएच् क्षेत्रातील मुलींच्या ४३% नोंदणीबद्दल समाधान व्यक्त केले. भारताला कौशल्याची राजधानी आणि सुपर पॉवर बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक आहे, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील पुरस्कार विजेते शिक्षक- डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन (जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धापूर, नांदेड)- २८ वर्षांपासून विज्ञान शिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. शेख यांनी ग्रामीण भागातील अल्पसंख्याक मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. 'सुरक्षित शिक्षण तुमच्या दारी' या उपक्रमातून त्यांनी गावापासून दूर भाड्याच्या जागेत शाळा सुरू करून मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. घरोघरी जाऊन पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले आणि मुलींसाठी मोफत सॅनिटरी पॅड वाटप सुरू केले. बालभारतीच्या सहावी ते बारावीच्या पुस्तकांसाठी लेखन केले असून त्यांना यापूर्वी राज्य पुरस्कारही मिळाला आहे. सोनिया विकास कपूर (एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २, मुंबई)- मुख्याध्यापिका सोनिया कपूर यांनी कमी खर्चातील शिक्षण साहित्याची निर्मिती करून सहकारी शिक्षकांना प्रशिक्षण दिले. 'टीच टू एनरिच' या पुस्तकाच्या लेखिका असलेल्या कपूर यांनी समूह आधारित शिक्षण आणि आयसीटीचा वापर शिक्षणात प्रोत्साहित केला. गेल्या २३ वर्षांत विद्यार्थ्यांच्या जीवनकौशल्ये आणि मूल्ये दृढ करण्यावर त्यांनी भर दिला. डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे (दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स, लातूर)- संगीत विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ. जगदाळे हे लातूरमधील पहिले राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते ठरले. तबलावादक आणि गायक म्हणून प्रसिद्ध असलेल्या त्यांनी गोंड आदिवासी वस्त्यांवर शिक्षण पोहोचवले, एचआयव्ही बाधित व अनाथ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारले. अंध विद्यार्थ्यांसाठी ब्रेल लिपीतील संगीत पुस्तक तयार करणे हे त्यांचे विशेष योगदान आहे. कोविड काळात दूरदर्शन, रेडिओ आणि सोशल मीडियाद्वारे त्यांनी लोकगीते व पोवाड्यांच्या माध्यमातून जनजागृती केली. त्यांच्या लिखाणातील १३ संगीतग्रंथ परदेशातही प्रसिद्ध झाले आहेत. डॉ. नीलाक्षी जैन (शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, मुंबई)- अभियांत्रिकी शिक्षणातील नाविन्यपूर्ण दृष्टिकोन आणि संशोधनासाठी डॉ. जैन यांचा सन्मान झाला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये यश मिळवले. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ तांत्रिक ज्ञानच दिले नाही तर सर्जनशीलता आणि संशोधनाची गोडी लावली.

प्रा. पुरुषोत्तम पवार (एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनीअरिंग, बारामती)- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये तंत्रज्ञानाविषयी जागरूकता आणि कौशल्य विकास घडवून आणण्यासाठी प्रा. पवार यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांनी उद्योजकतेला प्रोत्साहन देत स्थानिक समुदायालाही शिक्षणाशी जोडले. श्री. अनिल रामदास जिभकाटे (संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नागपूर)- नवीन पिढीला व्यावसायिक कौशल्य आणि शिक्षणाद्वारे सक्षम करण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय प्रयत्न केले. त्यांनी नागपूरच्या वर्किंग कार्यशाळांपासून आपली यात्रा सुरू केली, जिथे त्यांनी ७०० हून अधिक शिक्षण सत्रांचे आयोजन केले आणि १४ पेक्षा जास्त पात्रता (क्वालिफिकेशन्स) मध्ये सहभाग घेतला. त्यांच्या या योगदानामुळे शिक्षण आणि कौशल्य विकास क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रभाव पाडला आहे. या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि ५० हजार रुपयांचे रोख बक्षीस प्रदान केले.

## दिल्लीचे उपमुख्यमंत्री...

म्हणून देण्यात आली. वर्मा यांनी हे उत्पादने पाहून समाधान व्यक्त केले आणि स्वयंसहायता गटाच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी उपमुख्यमंत्री वर्मा यांनी दिल्ली सरकारच्या पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, यमुना नदीतील प्रदूषण रोखण्यासाठी दिल्ली सरकारने यंदा गणेश विसर्जनासाठी तब्बल ८५ कृत्रिम तलावांची निर्मिती केली आहे. या उपक्रमामुळे भाविकांना इको-फ्रेंडली विसर्जनाची सोय उपलब्ध झाली असून, नदीच्या संरक्षणास मोठी मदत होईल, असे श्री वर्मा म्हणाले. आज महाराष्ट्र सदनात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात नांदेड येथील गायक धनंजय जोशी यांनी सादर केलेल्या भक्तिगीतांनी उपस्थितांची मने जिंकली. श्री वर्मा यांनी या सोहळ्याचा आनंद घेत गणेशोत्सवाचा उत्साह, सांस्कृतिक वारसा आणि पर्यावरणपूरक उपक्रमांचे कौतुक केले.

## जय श्रीराम...

यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला असून, बीड येथील ए.आर. ऑफिसमध्ये देखील तक्रार अर्ज सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. विशेष म्हणजे, कर्ज घेताना संस्थापक अध्यक्षांकडून १६ टक्के व्याजदर सांगण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात २१ टक्के व्याजदर आकारण्यात आल्याचा गंभीर आरोपही फपाळ यांनी केला आहे. या प्रकरणामुळे ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी असून, बीड येथील ए.आर. ऑफिसने तातडीने दखल घेऊन रीतसर चौकशी करून न्याय द्यावा, अशी मागणी फपाळ यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## खासदार सुप्रिया...

नियुक्ती करण्यात आली आहे. बारामतीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उभारण्यात आले आहे. राज्यातील बृहन्मुंबईतील तसेच बृहन्मुंबई व्यतिरिक्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्रित रुग्णालयांसाठी अभ्यागत मंडळाची पुनर्रचना करण्यात आली आहे. बारामतीतील या संस्थेच्या अभ्यागत मंडळाची पुनर्रचना झाली आहे. यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे या अध्यक्षपदी होत्या. आता त्यांच्या जागी उपमुख्यमंत्री अजित पवारपत्नी; यांच्या पत्नी, राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या संस्थेच्या सदस्यपदी ज्योती नवनाथ बल्लाळ, डॉ. कीर्ती सतीश पवार, डॉ. सचिन कोकणे, श्रीनिवास वायकर, डॉ. दिलीप लोंढे, अविनाश गोपने, बिरजू मांढरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यापूर्वी या वैद्यकीय महाविद्यालयाच्या कार्यकारिणीवर खासदार सुप्रिया सुळे यांची नियुक्ती करण्यात आली होती ; परंतु आता राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आल्याने चर्चेला उधाण आले आहे.

## मुख्याधिकारी शैलेश...

अधिकारी या ठिकाणी कधीच उपलब्ध नसल्याचे दिसून आले. फक्त नगरपालिका फंडातून कोणत्या जवळच्या गुत्तेदाराला बिल द्यायचे याचेच आकडेमोड या दोन्हीकडून केले जात होते. नगरपालिका न येणारे बांधकाम विभागाचे अभियंता किरण देशमुख यांच्यावरच नगरपालिका मेहरबान असल्याचे दिसून आले. नीता अंधारे यांचा अंधार दूर झाला मात्र अद्यापही नगरपालिकेत प्रकाश पडला नसून मुख्याधिकारी शैलेश फडके यांनी पदभार घेतल्यापासून नगरपालिकेत पूर्ण वेळ थांबणे व कामाची शिस्त लावणे सुरू केले आहे मात्र या ठिकाणी काम करण्यासाठी कोणीही अधिकारी कर्मचारी उत्साही नसल्याचे दिसून येत आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांना वठणीवर आणा फक्त नगरपालिकेत बसून लोकांच्या समस्या ऐकून त्या डायरीत नोंद करून ठेवू नका. नगरपालिका पोखरून खाणाऱ्या किरण देशमुख सारख्या उंदराला बाहेर काढा. बीड नगरपालिकेतील नगरपालिका फंडातून नसते उद्योग केलेले बांधकाम विभागाचे किरण देशमुख यांच्यावर नूतन मुख्याधिकारी शैलेश खडसे हे पण मेहरबान होताना दिसत आहेत. बीड नगरपालिकेचे सर्वोच्च अधिकारी म्हणून मुख्याधिकारी कार्यरत आहेत याच ठिकाणी उपमुख्य कार्यकारी अधिकारीही दररोज उपलब्ध असतात मात्र बांधकाम विभागाचे अभियंता किरण देशमुख मात्र कार्यालयात कधीही येताना दिसत नाहीत. कामकाजाच्या वेळीही त्यांचा मोबाईल नेहमीच बंद असतो. सामान्य लोकांनी कामे कोणाला सांगायची हा प्रश्न उपस्थित होत असून तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांच्या वरद हस्ताखाली असणारे देशमुख पुन्हा मुख्याधिकारी फडसेंच्या मेहेरबानीने नगरपालिकात येत नसल्याचे चित्र आहे. या मुजोर अधिकाऱ्याला नगरपालिका प्रशासन का डोक्यावर घेत आहे. बांधकाम विभाग म्हणजे फक्त हत्ती पोहोचण्याचे विभाग झाले आहे. बीड नगरपालिकेचे स्वच्छता विभागच बीड शहरात कार्यरत असल्याचे दिसून येत आहे. इतर विभाग मात्र शांत व आपले नगरपालिका कोणतेच योगदान देत नसल्याचे दिसून येत आहे. एकीकडे शहरातील अनेक भागातील पथदिवे बंद आहेत सणासुदीच्या काळात प्रतदिवे बंद असल्याने नागरिकात संताप व्यक्त होत आहे तर नगरपालिका फंडातून कोट्यावधी रुपयांची खैरात वाटून मोकळे झालेले किरण देशमुख आजही चौकशीच्या फेऱ्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांची कार्यपद्धती शांत असून येणाऱ्या प्रत्येकाचे नोंदी त्या डायरीत करून घेतात. मात्र नगरपालिका विभागातच त्यांचे कनिष्ठ अधिकारी त्यांचे ऐकत नसल्याचे दिसून येत आहे. बांधकाम विभागातील महत्त्वाच्या पदावर कार्यात असणारे किरण देशमुख नावाचे अभियंते नगरपालिका का येत नाही याचे उत्तर मुख्याधिकारी देतील का. किरण देशमुख यांच्या विरोधात अनेक तक्रारी व प्रसार माध्यमात बातम्या प्रकाशित झाल्या याची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांनी यावर चौकशी समिती नेमणे आवश्यक आहे. त्यांनी मंजूर केलेले बिले याची पुनर तपसणी पुणे आवश्यक झाले आहे. अनेक फंडातून बोगस बिले दिली असल्याची चर्चा आहे याची चौकशी झाल्यास सत्य समोर येणारच. मात्र बीडच्या जनतेला गोड बोलून फक्त कारवाईचे आश्वासन देऊ नका बीडची जनतेच्या कानात बिडी व बगलात रेडू नाही.

## मराठा आरक्षणासाठी...

आम्ही अनेक वकील बांधव उच्च न्यालयाच्या वकिलांच्या कायम संपर्कात आहोत. हा लढा आपण आंदोलन च्या माध्यमातून लढला, तसाच हा लढा आता आपण न्यायालयीन पातळीवर लढणार आहोत, मराठा आरक्षणासाठी मराठा युवकाचे मोठे बलिदान गेले आहे, तसेच मराठा समाजातील युवकांना नोकरी व शिक्षणामध्ये खूप मोठा अन्याय सहन करावा लागत आहे. या लढ्यासाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील याचे मोठे योगदान आहे. तरी राज्य सरकार याची खबरदारी घेत नाही. यासाठी आज मुबंई उच्च न्यायालय खंडपीठ संभाजीनगर (औरंगाबाद) या मध्ये मराठा आरक्षणाची बाजू मांडण्यासाठी अॅड. ज्ञानेश्वर पोकळे पाटील यांच्या माध्यमातून आज कॅव्हेट पिटिशन नंबर ६१/२०२५ नुसार दाखल करण्यात आले आहे.

## भुजबळांना कोर्टाचा...

ओबीसीतून आरक्षण देण्यास शरद पवारांसह छगन भुजबळ यांनी कडवा विरोध केला.ओबीसींच्या अनेक संघटना रस्त्यावर उतरल्या, त्यावेळी राज्यात दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. वास्तविक पाहता, ऐतिहासिक ५८ मोर्चे काढणाऱ्या मराठा क्रांती मोर्चाची सुद्धा ओबीसीतून आरक्षण मिळावे अशीच मागणी होती. आणि गायकवाड आयोगाने सुद्धा तशीच शिफारस केलेली होती. पण खा शरद पवारांसह छगन भुजबळ आणि ओबीसी संघटनांचा तीव्र विरोध पाहून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गायकवाड आयोगाचा अहवाल तर स्वीकारला, पण ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्या या शरद पवार, छगन भुजबळ व ओबीसी संघटनांच्या मागणीनुसार मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या वरचे एसईबीसी आरक्षण दिले. जे आरक्षणाच्या भारतीय कायद्यानुसार देताच येत नव्हते. म्हणून पुढे ते २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले. मराठा समाजाची ही मोठीच फसवणूक होती,आणि त्यामुळे देवेंद्र फडणवीसांबद्दल मराठा समाजाच्या मनात कटुता निर्माण झाली होती.पण हे जे घडले होते ते खा शरद पवार व छगन भुजबळ यांच्यामुळे याची पक्की जाणीव फडणवीस यांना असावी.आणि ते ती कशी दूर करता येईल याच्या विचारात असावेत. त्यामुळे एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना फडणवीस यांनी जरांगे पाटलांच्या मागणीनुसार मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण दिलेही असते. पण त्यावेळीही खा शरद पवार सुद्धा मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण द्या असे म्हणायला तयार नव्हते, तर सरकारमध्ये मंत्री असताना सुद्धा छगन भुजबळ हे जरांगे पाटलांच्या विरोधात जिल्ह्या जिल्ह्यातून ओबीसींच्या सभा घेत होते. आणि २०२३ च्या अखेरपर्यंतही पवार भुजबळांचा विरोध कमी न झाल्यामुळे, कुणबी हे मराठ्यांचे सोयरे आहेत याचा आधार घेऊन मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळवून देणारा सग्या- सोयऱ्याचा अध्यादेश काढून फडणवीस यांनी शिंदे यांच्या हस्ते २०२४ च्या जानेवारी महिन्यात जरांगे पाटलांना सोपवला; व पुढे त्या अध्यादेशावर कार्यवाही करण्याऐवजी, फेब्रुवारी महिन्यात पुन्हा एकदा पन्नास टक्क्यांच्या वरचे दहा टक्के आरक्षण मराठा समाजाला दिले,जे सध्या न्यायालयाच्या विचाराधीन आहे.आणि ते रद्दच होणार आहे.म्हणजे, दुसऱ्यांदाही एस ई बी सी आरक्षण देऊन मराठा समाजाची फसवणूकच करण्यात आलेली आहे.पण यामुळे देवेंद्र फडणवीस मराठा समाजाचे शत्रू आहेत, अशी भावना समाजाच्या मनात निर्माण झाली होती.फडणवीसांच्या बाबतीत हे खूप चुकीचे घडत होते.

## त्वरितादेवी कल्लोळ...

तलवाडा ग्रामपंचायत व पोलीस प्रशासनाने दक्षता घेत तिर्थ शेत्र कल्लोळ वगळता इतरत्र बप्पाच्या विसर्जनची व्यवस्था करावी जेणे करुन देवीला येणा-या भाविकांना केमीकल युक्त पाण्याने ईजा पहोचनार नाही याची दक्षता गणेश मंडळाच्या सर्व पदाधिकारी व ग्रामपंचायत प्रशासनासह पोलीस प्रशासनाने घ्यावी आसेही प्रस्धिपत्राच्या शेवटी बापू गाडेकर यांनी सुचना व विनंती वजा आव्हान केले आहे. लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र त्वरितादेवी देवस्थान व तुळजाभवानी देवीचे मंदिर असून याच परिसरात तीर्थकुंड म्हणून प्रसिद्ध असलेले पुरातण कल्लोळ तीर्थ आहे. या कल्लोळ तीर्थातील पाणी भाविक-भक्त तिर्थ म्हणून तोंडात घेवून डोळयाला लावतात. धार्मिक ठिकाण असलेल्या या कल्लोळ तीर्थाची विटंबना होऊ नये यासाठी तीर्थ कुंडात गणपती बाप्पाचे विसर्जन करू नये असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार बापू गाडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकारद्वारे केले आहे. इतर ठिकाणी श्री गणरायाचे विसर्जन करण्यासाठी ग्रामपंचायतचे प्रशासक श्री मुसळे साहेब व पोलिस प्रशासन यांनी गांभीर्याने विचार करून योग्य पध्दतीने व्यवस्था करण्याची दक्षता घ्यावी अशी मागणी देखील बापू गाडेकर यांनी केली आहे.

## शांताई अर्बन...

यांचा जन्मदिवस शिक्षकांच्या कामगिरीसाठी साजरा केला जातो तो दिवस म्हणजे शिक्षक दिन आणि शिक्षक दिनाचे औचित्य साधून शांताई अर्बन तर्फे शैक्षणिक क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या बीड मधील शशीकांत अरुण डाके सर व सुहास रसाळ सर त्यांनी आतापर्यंत बऱ्याच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व त्यांची जडणघडण मध्ये मोलाचा वाटा आहे तसेच मुलांना शिक्षणाची आवड निर्माण करून कलागुणांना त्यांची स्किल समोर आणण्याचे काम हे सर सातत्याने करत असतात या दोघांच्या कर्तुत्वान सत्कार मूर्तींची कार्याची दखल घेत यांचा सत्कार शांताई अर्बन चे संस्थापक अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे व संस्थेची उपाध्यक्ष संदीप वाघमारे सर यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सन्मानचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शांताई अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष संदीप वाघमारे, संचालक परमेश्वर शिंदे , आरती कुलकर्णी, राजेंद्र काळे व सर्व संचालक मंडळ कर्मचारी आणि पिग्मी एजन्ट उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शिक्षकांचा गौरव करण्याचे भव्य काम शारदा प्रतिष्ठान करत आहे : इंद्रजित देशमुख

## सुजाण नागरिक घडविण्याची किमया शिक्षकच करु शकतो : अमरसिंह पंडित ; शारदा प्रतिष्ठानचे आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा थाटामाटात संपन्न

**गेवराई । प्रतिनिधी**

शिक्षकी पेशात आपण आलोय हे आपले भाग्य आहे. येणाऱ्या पिढीला आपण गुणवत्ता पुर्ण शिक्षण दिले पाहिजे. आजचे सर्वात श्रेष्ठ दान हे शिक्षण क्षेत्रात आहे आणि या पवित्र क्षेत्रात शिक्षणाचे पवित्र काम करणाऱ्या गुरुजनांचा गौरव करण्याचे भव्य काम शारदा प्रतिष्ठान करत आहे. जीथे भव्यता आहे तीथेच दिव्यता आहे, आणि तिथेच आपण आदराने झुकले पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध विचारवंत इंद्रजित देशमुख यांनी केले. सुजाण नागरिक घडविण्याची किमया शिक्षकच करु शकतो ती किमया गेवराई तालुक्यात होऊन शिक्षण क्षेत्रात क्रांती घडेल असा विश्वास व्यक्त करुन शिक्षकांनी या दृष्टीने काम करण्याचे आवाहन प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित यांनी केले. शारदा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात ते बोलत होते.

माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या गुणी गुरुजनांचा गौरव करण्याच्या उद्देशाने मागील सोळा वर्षांपासून शारदा प्रतिष्ठान सातत्याने शिक्षक दिनी आदर्श शिक्षकांना पुरस्कार देवून गौरव केला जात असून प्रतिष्ठानचा १७ वा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण समारंभात शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर शिक्षकदिनी र.भ. अट्टल महाविद्यालच्या गोदावरी सभागृहामध्ये मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या समारंभाला सुप्रसिध्द विचारवंत तथा व्याख्याते इंद्रजित देशमुख, शारदा प्रतिष्ठानचे कार्यवाह अमरसिंह पंडित, आ. विजयसिंह पंडित, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप, प्रतिष्ठानचे सचिव भाऊसाहेब नाटकर, निवड समितीचे अध्यक्ष नारायणराव मोटे, सरपंच परिषदेचे जिल्हाध्यक्ष कालिदास नवले, शिक्षक पतसंस्थेचे विष्णू खेत्रे, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण काळम, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, जालिंदर पिसाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात अमरसिंह पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात गुणवंत शिक्षकांचा सन्मान शारदा प्रतिष्ठानगेल्या सोळा वर्षांपासून करत असून या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी निकोप वातावरणात स्पर्धा झाली पाहिजे. कृषी पदवीधारक तरुणांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या भागात कृषी क्षेत्रात करुन उत्पादन वाढ झाली तर तो खरा चमत्कार असेल. खाजगी शाळापेक्षाही जिल्हा परिषदेच्या शाळेत चांगले काम होत असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी इंद्रजित देशमुख यांनी आपल्या चितनांतून विचारांची पेरणी केली. आज माणूस हिंसेकडे वळतो आहे त्याला प्रेम, मानवता, आदर या बाबी समजावून सांगून त्याला माणूस म्हणून कसे जगता येईल यावर शिक्षकांनी किमी केले पाहिजे. आपण शिक्षक झालो हे आपले भाग्य आहे आणि या शिक्षकांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारण्याचे काम शारदा प्रतिष्ठानच्या माध्यमातून अमरसिंह पंडित करत आहेत. थोर विभूतींकडून मिळालेला दिव्य वारसा आणि संस्कृतीची पताका आता आपल्या खांद्यावर आहे, ती आपण पुढे सक्षमपणे घेऊन गेले पाहिजे असेही ते म्हणाले.



### ● सत्कार सोहळ्यात झाला या गुरुजनांचा गौरव

या कार्यक्रमात जि.प.प्रा.शाळा, धुमेगांव येथील सहशिक्षक विठ्ठल देशमुख, जि.प.प्रा.शाळा, मोरे वस्ती, राजपिंप्री येथील सहशिक्षक कैलास पट्टे, जि.प.प्रा.शाळा, गुळज येथील सहशिक्षक भगवान मोरे, जि.प.प्रा. शाळा, हिवरा बु., ता. माजलगांव येथील सहशिक्षक ओमप्रकाश आगे, जि.प.प्रा.शाळा, सांडरवण, ता. बीड येथील सहशिक्षक बबन नांदे, जि.प.प्रा.शाळा, पाचेगांव येथील सहशिक्षिका पुष्पांजली दुधाळ, जि.प.प्रा. शाळा, मारफळा तांडा येथील सहशिक्षक विश्वभुषण सोनवणे, जि.प.माध्यमिक शाळा, तलवाडा येथील सहशिक्षक सतिष खेडकर, शारदा विद्या मंदिर, गेवराई येथील सहशिक्षक दादाराव काकडे, जि.प.माध्यमिक उर्दु (मुलींची) शाळा, गेवराई येथील सहशिक्षक महंमद इलियास आणि विशेष शिक्षक म्हणुन जि.प.प्रा.शाळा, केकतपांगरी येथील सहशिक्षक डॉ. तात्यासाहेब मेघारे या अकरा आदर्श शिक्षकांचा सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शालश्रीफळ देवून सपत्नीक गौरव करण्यात आला.

# मराठा आंदोलकांचे बॅनर फाडणे व धनगर समाजाची बदनामी प्रकरणी कठोर कारवाईची मागणी ; लिंबागणेश येथे निदर्शने: डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पोखरी (मैंदा) येथील विठ्ठल मंदिरासमोर लावलेले मराठा आंदोलकांचे बॅनर ब्लेडने फाडणे तसेच धनगर समाजाविषयी गलिच्छ शब्द वापरून समाज माध्यमांवर व्हिडिओ व्हायरल करण्याच्या घटनेचा निषेध करत आज लिंबागणेश येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात निदर्शने करण्यात आली. या वेळी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक बीड यांना निवेदन देण्यात आले. जय भवानी जय शिवाजी, येळकोट येळकोट जय मल्हार अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.



आंदोलकांनी सांगितले की, जाणूनबुजून समाजात जातीय तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने दोन घटना घडवल्या आहेत. बॅनर फाडल्यामुळे मराठा समाजाच्या भावना दुखावल्या असून, व्हिडिओद्वारे धनगर समाजाची बदनामी करून त्यांच्याही भावना दुखावल्या आहेत. त्यामुळे दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.


या निदर्शनात डॉ. गणेश ढवळे, कल्याण वाणी, राजेभाऊ गिरे, रामकिसन गिरे, बाळासाहेब मुळे, ॲड. गणेश वाणी, दामोदर थोरात, सुरेश निर्मळ, पांडुरंग वाणी, औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, अशोक जाधव, रामदास मुळे, विठ्ठल कदम, बंकट लगास, मनोहर कोटुळे, महादेव कुदळे, गणपण तागड, विक्रम दाभाडे, चंद्रकांत मुळे, रामदास वाणी, सुखदेव वाणी, सय्यद रफिक आदींचा सहभाग होता.

# आदित्य शिक्षण संस्थेत शिक्षक दिन उत्साहात

## रांगोळीतून व्यक्त केली गुरू प्रति कृतज्ञता, ८ विद्यार्थी बनले शिक्षण, विद्यार्थांना दिले धडे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य डेंटल कॉलेज मध्ये ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि कृतज्ञतेच्या भावनेने साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी गुरू शिष्यांचे नाते सांगणारी रांगोळी काढून गुरू प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली. ऋषिकेश रासकर,हर्षली राठोड,उज्वला मुंढे,सारिका कापसे,प्रथमेश भोईर,निकिता जंगीद,ज्ञानेश जुत्ते,आकांक्षा मुलगीर,साहिल पोइंकार या विद्यार्थ्यांनी शिक्षण होऊन विद्यार्थांना ज्ञानदानाचे कार्य केले. माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करण्यात आले.




आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा,संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या शिक्षक दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांविषयी असलेली निस्सीम आदर भावना विविध कार्यक्रमाद्वारे व्यक्त केली. मार्गदर्शन, संस्कार व मूल्यांचे बीज विद्यार्थ्यांच्या मनात पेरणाऱ्या आपल्या गुरुजनांबद्दल विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केली. शिक्षकांच्या योगदानामुळेच विद्यार्थी जीवनातील अंधार दूर होतो व ज्ञानाचा दीप उजळतो, हे सत्य सर्वांनी अधोरेखित केले. यावेळी आदित्य डेंटल कॉलेज चे प्राचार्य डॉ.हिमांशू श्रीवास्तव , आदित्य आयुर्वेद चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी, आदित्य कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा, आदित्य कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सतीश कचरे, आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमोल सानप सानप, आदित्य नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विकास गर्जे, आदित्य फिजिओथेरपी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.बालाजी बहिरवाल व सर्व महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि शिक्षकोत्तर कर्मचारी उपस्थित होते.



*घाटसावळी येथे सुरेशजी पाटील यांच्या एस. पी. शुगर साखर कारखान्याच्या मशिनरीचे पूजन गुरुवर्य नवनाथ बाबा गोरक्षनाथ टेकडी यांच्या हस्ते संपन्न झाले. याप्रसंगी उपस्थित राहून एस. पी. शुगर साखर कारखान्याचे चेअरमन सुरेशजी पाटील यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माझ्यासह SBI बँकेचे मॅनेजर राजेशजी गुप्ता सर, राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हाध्यक्ष बळीराम आप्पा गवते, शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, गोरक्षनाथ पेट्रोलियमचे मालक चंद्रकांतजी लांडे पाटील, कल्याणजी लांडे पाटील, प्रकाशजी ठाकुर, आन्नासाहेब लांडे, घाटसावळीचे सरपंच दादासाहेब लांडे तसेच सर्व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

# परराज्यातील विदेशी मद्य वाहतूक प्रकरणी कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाणे जिल्ह्यातील खारेगांव – ठाणे रस्त्यावर गोवा राज्यातील मद्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर खारेगांव येथे ३ सप्टेंबर रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत गोवा राज्यात निर्मित भारतीय बनावटीच्या विदेशी मद्याच्या १४०० बॉक्स दारूबंदी कायद्यातंर्गत जप्त करण्यात आले. टाटा कंपनीच्या डीडी ०१ ए ९०१७ क्रमांक असलेल्या चारचाकी टेम्पो वाहनासह एकूण १ कोटी ५६ लाख ६३ हजार ८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच आरोपी मोहम्मद समशाद सलमानी (वाहनचालक) यास अटक करण्यात आली आहे.

राज्य उत्पादन शुल्कचे आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागाचे विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे अधीक्षक प्रवीण तांबे, उपअधीक्षक श्री. पोकळे, श्री. वैद्य, नवी मुंबईचे उपअधीक्षक ए. डी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई भरारी पथकाचे निरीक्षक एम. पी धनशेट्टी, दुय्यम निरीक्षक एन. आर. महाले, सहा. दुय्यम निरीक्षक बी. जी थोरात, तसेच जवान पी. एस नागरे, पी. ए महाजन, व्ही. के पाटील, श्रीमती एस.एस यादव, एम. जी शेख यांचा सहभाग होता.

या गुन्ह्याचा पुढील तपास अधीक्षक प्रवीण तांबे, निरीक्षक श्री. धनशेट्टी करीत आहेत, असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने कळविले आहे.

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयांमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती महान तत्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना जयंती निमित्त अभिवादन आणि आदर्श शिक्षकांचा सत्कार समारंभ या विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या मुख्य उपस्थितीत उत्साहामध्ये संपन्न झाला.



या कार्यक्रमाच्या प्रारंभही डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयातील मुख्याध्यापक बी.ए. हावळे आणि सर्व शिक्षकांचा सत्कार पुष्पगुच्छ,पुष्पहार आणि श्रीफळ देऊन वर्ग प्रतिनिधींनी केला. याप्रसंगी मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याची आणि देश व भारतीय समाजाच्या उत्कर्षासाठी केलेल्या त्यागाचे स्मरण आपल्या मार्गदर्शनातून करून दिले. या कार्यक्रमाचे संचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख विजय देशमुख, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन यु.बी. पवळ यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक आर.बी. घुले, एल.बी. हजारे,एस.एस. गायकवाड यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी प्रतिष्ठित नागरिक कैलास घुले हे उपस्थित होते. तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, बहुसंख्य विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# मुंबई गोवा महामार्गावर भीषण अपघात, एकाचा जागीच मृत्यू तर पाच जण जखमी

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. मुंबईहून कणकवलीच्या दिशेने जाणारी महिंद्राची मेराझो कार अचानक थेट ट्रकच्या खाली घुसली आणि त्यामुळं हा भीषण अपघात झाला आहे. अपघातानंतर लगेचच पोलिस घटनास्थळी दाखल झाले असून, जखमींना तात्काळ जवळच्या रुग्णालयात हलवण्यात आलं आहे.



मुंबई-गोवा महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे पुन्हा एकदा सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विविध कारणांनी या महामार्गावर अपघात होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अशा अपघातात अनेकांचा मृत्यू देखील झाल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. दरम्यान, आज अपघातात एकाचा मृत्यूझाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे.

माथेरान घाटात अपघाताची मालिका सूरूच –रायगड जिल्ह्यातील माथेरान घाटातील अपघातांची मालिका सुरूच आहे. आज माथेरान घाटात एका कार कंपनीची पुन्हा एक नवीन ट्रायल करण्यासाठी आलेली कार थेट एका नाल्यात शिरल्यामुळं या वाहनाचे नुकसान झाले आहे. माथेरान घाटात असणाऱ्या जुमापट्टी स्थानकाच्या वरील वळणावर कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही दुर्घटना घडली आहे.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त 75 हजार युवक-युवतींना रोजगाराभिमुख प्रशिक्षणाची संधी

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबर रोजी ७५ वा वाढदिवस असून हा दिवस अविस्मरणीय व्हावा यासाठी कौशल्य विभाग रोजगार आणि स्वयंरोजगार सेवा पंधरवडा साजरा करत आहे. या अनुषंगाने राज्यातल्या सुमारे ७५ हजार युवक आणि युवतींना कौशल्यविषयक प्रशिक्षण दिले जाणार असल्याची माहिती कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली आहे. येत्या १७ सप्टेंबर पासून २ ऑक्टोबर पर्यंत हा पंधरवडा सुरु राहणार असून १ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) अभ्यासक्रमांचा शुभारंभ केला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगार मिळवून देण्यासाठी स्थानिक उद्योगांच्या मागणीनुसार प्रत्येक जिल्ह्यात विविध उपक्रम राबवत आहेत. तर मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनात राज्यातील आयटीआयमध्ये रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध करून देणारे अत्याधुनिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. केवळ शहरी भागातच नाही तर ग्रामीण भागातही आता अत्याधुनिक अल्पकालीन अभ्यासक्रम सुरु होत आहेत. कौशल्य विकासाद्वारे युवक व युवतींचे सक्षमीकरण हा यामागचा मूळ उद्देश आहे. मात्र अनेकांना नियमित कार्यशाळेत जाऊन वेळेअभावी किंवा इतर कारणास्तव प्रशिक्षण घेण्याची संधी मिळत नाही, अशा होतकरू युवकांना आणि युवतींना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रत्येक जिल्ह्यात अल्पकालीन अभ्यासक्रमाची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. आयटीआयच्या नियमित वर्गाच्या व्यतिरिक्त इतर उपलब्ध वेळेत हे अभ्यासक्रम घेण्यात येतील.



राज्यातील आयटीआयमध्ये सध्या प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसोबतच अतिशय अल्पदरात युवक आणि युवतींना रोबोटिक, सौर ऊर्जा तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय, व्यक्तिमत्व आणि सामाजिक विकासासंदर्भात अत्याधुनिक अभ्यासक्रम चालवले जाणार आहेत. स्थानिक उद्योग आस्थापनांमध्ये रोजगारासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि प्रशिक्षण त्याच जिल्ह्यात मिळाल्याने तरुणांना आपला जिल्हा सोडून अन्य ठिकाणी रोजगारासाठी जावे लागणार नाही. उद्योगांना पूरक स्वयंरोजगाराच्या संधी या अल्पकालीन अभ्याक्रमाच्या माध्यमाने तरुणांना उपलब्ध होणार आहेत. विशेष म्हणजे सध्या आयटीआयचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींकडून या अभ्यासक्रमांसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही. https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करून विद्यार्थ्यांना विविध अभ्यासक्रमास प्रवेश देण्यात येणार आहे. या संकेतस्थळावर राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात सुरु होत असलेल्या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती तसेच प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करावी, असे आवाहनही मंत्री श्री. लोढा यांनी केले आहे.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • शनिवार, दि. ०६ सप्टेंबर २०२५ • पान ४

# बीड शहरातील गजबजलेल्या रस्त्यांवरची वाहतूक कोंडी फोडा

## महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची पोलीस अधीक्षक कार्यालयात मागणी

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील अण्णाभाऊ साठे चौक ते सुभाष रोड,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक व भाजीमंडी राजुरी वेस ते कारंजा रोड पर्यंत वाहतूकची होत असलेली कोंडी फोडण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे वतीने पोलिस अधीक्षक कार्यालयात करण्यात आली.

असे की, बीड शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या व नेहमी सणासुदीच्या कळत जिल्ह्यातील नागरिकांच्या खरेदीसाठी पहिली पसंत असलेल्या असा



व्यापारी क्षेत्र म्हणजे सुभाष रोड.या व्यापारी क्षेत्रात नेहमी जिल्हाभरातून खरेदीसाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांची गर्दी असते. या सणासुदीच्या काळातील अण्णाभाऊ साठे चौक ते सुभाष रोड डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक व भाजीमंडी राजुरी वेस ते कारंजा रोड पर्यंत रस्त्याची अथवा वाहतुकीची कोंडी होत आहे. यावर उपाय म्हणून अतिरिक्त पोलिस कार्मचार्याची नियुक्ती करून वाहतुकीत होत असलेली कोंडी फोडण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने उप विभागीय पोलीस अधिकारी बालकृष्ण हनपुडे यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे रामेश्वर आबा साळुंखे (जिल्हाध्यक्ष मनसे शेतकरी सेना), अमर जान पठाण (बीड शहराध्यक्ष), आकाश सुरवसे (जिल्हाध्यक्ष मनसे सहकार सेना), शैलेश जाधव (बीड कार्यालय अध्यक्ष), आकाश टाकळकर (बीड शहर उपाध्यक्ष), कार्तिक ज्वेलरी (बीड शहर सचिव), विजय शिंदे (बीड शहर उपाध्यक्ष) सह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## त्वरितादेवी कल्लोळ हे भाविकांसाठी तिर्थ आसल्याने या ठिकाणी गणपती विसर्जन करु नये : बापू गाडेकर

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे महाराष्ट्रातील जागृत व जाज्वल्य आसे माता त्वरितादेवीचे(जगदंबा)पुरातन मंदिर असुन या त्वरितादेवीच्या दर्शनाला वर्षाचे बाराही महिने महाराष्ट्राच्या काना कोप-यातुन भाविक भक्त मनोभावे येत आसतात. या ठिकाणी आल्यावर सर्व प्रथम या ठिकाणी देवीच्या पायथ्याजवळ आसलेल्या धार्मिक पवित्र कल्लोळ नावाच्या पुरातन बारवात(विहिर) भक्तगण जल प्राषण करुन विधिवत



आपले नेत्र या कल्लोळातील पवित्र जलाने धुऊन मंगच जंगदंबे चरणी नतमस्तक होतात. आस्या या पुरातन कल्लोळास मोठ्या प्रमाणात महती जुने जाणकार सांगतात. या कल्लोळातील जल भाविकांच्या नेत्र व मुखासाठी व विविध शारीरिक वेदना दैविक आजार घालवण्यासाठी उपयुक्त आसल्याचा भाविकांचा हजारो वर्षापुर्वीचा विश्वास असुन भक्तगण सातत्याने या कल्लोळाचे पवित्र राखीत आलेले आहेत. ऊध्या गणपती बप्पाचे विसर्जन आसल्याने तलवाडा व तलवाडा पंचक्रोशीतील गणेश भक्तांनी देखील या कल्लोळाचे पवित्र जपने म्हत्वाचे असुन विसर्जन काळात या पवित्र कल्लोळात कुणीही बप्पाचे विसर्जन करु नये आसे आव्हान समता परिषदेचे गेवराई तालुकाध्यक्ष बाप्पु अण्णा गाडेकर यांनी केले आहे. गणपती विसर्जनासाठी गाव तलाव मोठ्या प्रमाणात भरलेले असुन ▶ उर्वरित पान २ वर



*दैनिक मराठवाडा पत्र कार्यालयामध्ये श्रींची आरती करताना एडवोकेट धसे साहेब मराठवाडा पत्र चे संपादक दत्तात्रय नरनाळे छायाचित्रात दिसत आहेत.*



*समर्थ राजयोग चा विवेकाचार्य पुरस्कार जेष्ठ शिक्षक नेते तथा सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे संस्थापक सचिव सन्माननीय उत्तमराव पवार साहेब यांना प्रमुख मान्यवर बीड जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान व मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला सरस्वती विद्यामंदिर चे आधारस्तंभ सन्माननीय उत्तमराव पवार साहेबांना हा अतिशय मानाचा समजला जाणारा विवेकाचार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल सरस्वती विद्यामंदिर चे मुख्याध्यापक श्री.गोरे सर तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी वृंद यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे.*

## शांताई अर्बन मध्ये भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती साजरी

**बीड । प्रतिनिधी**

दि. ५ सप्टेंबर रोजी शांताई अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी, बीड येथे भारताचे माजी राष्ट्रपती व तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

शांताई अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी ही संस्था नेहमीच सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांत पुढाकार घेऊन समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडत असते. सदस्यांच्या प्रगतीसोबतच सामाजिक जाणीवेची जपणूक करण्याचा सातत्याने प्रयत्न ही सोसायटी करत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आदरणीय



शशीकांत अरुण डाके सर, सुहास रसाळ सर शांताई अर्बनचे अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन ▶ उर्वरित पान २ वर

## जय बजरंग गणेश मंडळ आयोजित रक्तदान शिबिरास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

जय बजरंग गणेश मंडळ द्वारा शिंदे नगर फेज २ भद्रामारुती कॉलनी बीड येथे गणेश मंडळाच्या वतीने महालॅब रक्त चाचणी व रक्तदान रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.

जिल्हा शल्यचिकित्सक राऊत यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या शिबिरास विशेषतः महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. डॉ. राऊत यांनी शिबिरासाठी अत्यावश्यक साधन सामग्रीसह डॉक्टर कर्मचाऱ्यांची टीम दिली होती. आरोग्य उपक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे किशोर चव्हाण सर, निखिल तिपाले, सचिन येवले,धनंजय लेहने,सुशील काळे, विशाल व्यवहारे, नितीन येवले, ऋषिकेश



येवले आबा जाधव वैभव वरपे ऋषिकेश लेहने,अजिंक्य काळे, निखिल धुताडमाल व मंडळाचे सर्व कार्यकर्ते यांनी अथक परिश्रम घेतले. जय बजरंग गणेश मंडळाचे हे पाचवे वर्ष वर्ष असून दरवर्षी सामाजिक उपक्रम, स्पर्धा व ज्ञान मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. भद्रा मारुती कॉलनी मधील महिला पुरुष मुले मंडळाच्या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

## ईद-ए-मिलाद उन-नबी निमित्त रक्तदान शिबीरास परवेज कुरेशी यांची भेट



**बीड । प्रतिनिधी**

ईद-ए-मिलाद उन-नबी च्या निमित्ताने बालेपिर येथे एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्याचा उद्देश रक्तदान सर्वश्रेष्ठ दान आहे या संदेशाला प्रोत्साहन देणे होता. या शिबिरात असंख्य युवकांनी रक्तदान करून बीड शहराच्या रक्ताच्या तुटवड भासत आहे ही गोष्ट लक्षात ठेव रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. शिबिरास बीड जिल्हा अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे बीड शहर काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष परवेज कुरेशी, तालुका अध्यक्ष गणेश बजगुगे मोहिबुउर रहमान, सय्यद फरान, रईस शेख, फिरोज शेख आणि अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी, शहराध्यक्ष परवेज कुरेशी यांनी रक्तदानाचे महत्त्व स्पष्ट केले आणि सांगितले की, रक्त निर्माण करता येत नाही, त्यामुळे दातेच पुढे यायला हवेत. त्यांनी या उपक्रमाचे कौतुकही केले आणि असे उपक्रम दरवर्षी आयोजित करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमात बालेपिर भागातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## थोडक्यात...

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे रविवार रोजी अनिल म. कासकर यांचे कीर्तन

**बीड । प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील पहिली पुण्यतिथी भाद्रपद शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. अनिल महाराज कासकर मौजवाडी ता.जि.बीड यांचे रविवार दिनांक ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी मौजवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.



### इमानदार शिक्षकांना ईश्वरीय वरदान समजून समाजाने आदर करावा: खुर्शीद आलम



**बीड । प्रतिनिधी**

दि.५ सप्टेंबर शिक्षक दिवस म्हणून साजरा केला जातो याच निमित्ताने शिक्षक सन्मानाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बीड नगरपरिषदेचे मा. सभापती तथा शरदपवार रॉ.काँ. चे शहराध्यक्ष खुर्शीद आलम होते तर प्रमुख पाहूणे म्हणून नगरसेवक सुजात देशमुख साहेब,एजाज इनामदार,रफिक सेठ कुरेशी,मुस्तकीम सौदागर उपस्थित होते, अध्यक्षीय मार्गदर्शनात खुर्शीद आलम म्हणाले की आज ५ सप्टेंबर शिक्षक दिवस म्हणून साजरा करून या दिवशी शिक्षकांना सम्मानित करण्यात येतो कारण शिक्षक हे समाजाचा महत्त्वाचे घटक असुन शिक्षकांच्याच विश्वासावर मुलांचे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवतात, शिक्षक आपल्या मेहनत इमानदारीने मुलांना शिक्षण देऊन समाजाला दशा दिशा देण्याचे काम करतोय म्हणून इमानदारीने मुलांना शिकविणारे शिक्षक हे समाजासाठी ईश्वरीय वरदान आहे म्हणून समाजानेही शिक्षकांचे आदर करावे कारण समाजाचे शिक्षकांना सम्मान करणे हेच शिक्षकांसाठी सर्वांत मोठा पुरस्कार आहे, तसेच जे शिक्षक आपल्या कर्तृत्वात कामचुकार पणा करत असेल तर अश्यांना इमानदार समाजसेवकांनी पुढे येऊन धडा शिकवावा असेही आवाहन खुर्शीद आलम यांनी केले आहे, यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांचे सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आले आहेत, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंदन पठाण सर यांनी केले तर आभार प्रदर्शन सफदर देशमुख सर यांनी केले आहे.

### महाबोधी महाविहार मुक्तीसाठी भिक्खु संघाची धम्मध्वज रॅली

**भिक्खु धम्मशिल थेरोंचे उपस्थित राहण्याचे आवाहन**



**बीड । प्रतिनिधी**

बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी महाविहार मुक्तीसाठी काढण्यात आलेली धम्मध्वज रॅली आता बीडमध्ये दाखल होत आहे. नागपूर येथील ऐतिहासिक दीक्षाभूमीपासून सुरुवात झालेली ही रॅली मध्यप्रदेशातील सौंसरपर्यंत मार्गक्रमण करत असून, तिचा ठाणाव मंगळवार (दि. ९ सप्टेंबर) रोजी बीडमध्ये होणार आहे. या संदर्भात शुक्रवार (दि. ५) रोजी बीड येथील शासकीय विश्रामगृहात महाबोधी महाविहार मुक्ती जिल्हा समितीची महत्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत रॅलीच्या आयोजनाबाबत चर्चा करण्यात आली. बैठकीत भिक्खु धम्मशिल थेरो यांनी सांगितले की, महाबोधी महाविहार येथेच तथागत गौतम बुद्धांना ज्ञानप्राप्ती झाली होती. हे स्थळ बौद्धांसाठी जगातील सर्वात पवित्र स्थळ असून, त्याचा ताबा बौद्धांनाच असायला हवा. परंतु सध्या हा ताबा हिंदू ब्राह्मणांकडे आहे. विहाराचा ताबा बौद्धांना मिळावा या मागणीसाठी धम्मध्वज रॅली काढण्यात आली आहे. भन्ते विनाचार्य यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली निघाली असून, त्यात भिक्खु संघासह सुमारे शेकडो उपासक- उपासिका सहभागी झाले आहेत. बीडमध्ये या रॅलीचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात येणार असून, बौद्ध अनुयायांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक समितीकडून करण्यात आले आहे. शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून सामाजिक न्याय भवनापर्यंत रॅलीचे आयोजन करण्यात आले .

### शासकीय जागेवर जुगार खेळणाऱ्या सात जणांविरुद्ध गुन्हा

**आष्टी । प्रतिनिधी**

जलसंपदा विभागाच्या मोकळ्या जागेत चिंचाच्या झाडाखाली जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना कळताच पोलिसांनी गुरूवारी सायंकाळच्या दरम्यान धाड टाकत पाच हजाराचा मुद्देमाल जप्त करत सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आष्टी तालुक्यातील दादेगांव येथील जलसंपदा विभागाच्या शासकीय जागेत गुरूवारी सायंकाळच्या दरम्यान चिंचेच्या झाडाखाली तिरट नावाचा जुगार सुरू असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना कळताच पोलिसांनी धाड टाकुन ४ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिस अंमलदार हनुमंत खंडेकर याच्या फिर्यादीवरून आरोपी बबन रामराव जाधवर,मुकुंदराज विठ्ठल कोल्हे रा.दादेगांव, केरू लक्ष्मण गुंजाळ लोंखडवाडी,संतोष दाजीबा कांबळे घाटापिंपरी,सुदाम मुरलीधर पोकळे,गणेश मुरलीधर महाजन,दिपक रोहिदास साळवे रा.दादेगांव ता.आष्टी.जि.बीड या सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.